| | |
|---|---|
| | **जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**<br>मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ओरोससिंधुदुर्गनगरी-,<br>ताकुडाळ., जिसिंधुदुर्ग., पिनकोड -416 812<br>दुरध्वनी क्रमांक -02362 - 228158, फॅक्स क्रमांक -02362 - 228589/228846 |
| | **संकेतस्थळ** - **www.sindhudurg.gov.in** **ईमेल-** **colloffice@gmail.com** |

जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/ब्रेक द चैन/२०२१, दिनांक :- २०/०४/२०२१

**वाचले :-**

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम १४४.
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०, १४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोजीच्या अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. या कार्यालयाकडील आदेश क्रमांक जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/ब्रेक द चैन/२०२१, दि. १४/०४/२०२०
६.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU /२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २०/०४/२०२१ रोजीचे आदेश.

---

## विषय :- कोराना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश.

## ;-आदेश -;

ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंध कायदा, 1897, दिनांक 13/03/2020 पासून लागू करुन खंड 2, 3, 4 मधील तरतूदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार रोखणे आणि त्यासाठी ठोस उपाययोजना हाती घेणे आवश्यक झाले आहे. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील No DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक 29/06/2020 रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्हयातील परिस्थिती प्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत.

त्याअर्थी, **सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोरोना संसर्ग साखळी तोडण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०२१** पर्यंत **खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत**

1. सर्व किराणा सामान दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, कन्फेक्शनरी, सर्व खाद्य पदार्थाचे दुकाने (चिकन, मटण, कोंबडी, मासे आणि अंडी ) कृषी अवजारे व शेतमालाशी संबंधित सेवा, पशुखाद्य विक्री सेवा, पावसाळी हंगामासाठी व्यक्तींसाठी तसेच संस्थासाठी साहीत्य विक्री करणेची दुकाने सकाळी 7.00 ते दुपारी 11.00 वाजेपर्यंतच चालू ठेवता येतील.
2. तथापी या दुकानांना सकाळी 7.00 ते रात्रौ 8.00 पर्यंत घरपोच सेवा (Home delivery) देता येईल.

उपरोक्त बाबी वगळता या कार्यालयाकडून यापुर्वी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश व सूचना वा त्यात उल्लेख असलेल्या बाबी या सर्व निर्बंधासह पुढील आदेश होईपर्यंत तश्याच लागू राहतील.

**(के. मंजूलक्ष्मी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग**

प्रति :- सर्व नागरिक व आस्थापना सिंधुदुर्ग जिल्हा.

प्रत :- १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
२. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग
३. जिल्हा शल्य चिकीत्सक, सिंधुदुर्ग
४. जिल्हा आरोग्य अधिकारी, सिंधुदुर्ग
५. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सिंधुदुर्ग
६. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग
७. सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, सिंधुदुर्ग
८. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
९. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
१०. गट विकास अधिकारी (सर्व)
११. मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका / नगरपरीषद / नगरपंचायत.
१२. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिंधुदुर्ग